# माझें पुरवणी वाचन ३ रें



IRBK-0103824

— लेखक —

र. म. जोशी

वि. न. गोंधळेकर

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. ३८२४

प्रकाशन, पुणें-२.

प्राथमिक शाळांच्या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें तयार केलेलें

# माझें पुरवणी वाचन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

# पालकांशीं हितगुज

मातृभाषेचा अभ्यास करतांना फक्त क्रमिक पुस्तकांवरच अवलंबून राहून भागत नाहीं. क्रमिक पुस्तकांबरोबरच सोपीं सोपीं आणि मनोरंजक अशीं पुरवणी वाचन पुस्तकें मुलांनीं वाचणें आवश्यक असतें. या दृष्टीनेंच आम्हीं ' माझें पुरवणी वाचन ' हीं माला सुरू केली आहे.

या पुरवणी वाचन मालेंत गोष्टी, वर्णनपर धडे, आत्मवृत्तपर धडे, थोरांच्या कथा, इत्यादि विविध प्रकार आहेत. विद्यार्थ्यांच्या जीवनांतील प्रसंग आणि अनुभव हे यांतील कांहीं धड्यांत आढळतील. या पुस्तकांची भाषा सोपी वापरली आहे आणि यांत प्रसंगानुरूप भरपूर चित्रें घातलीं आहेत. सारांश, पुरवणीवाचन पुस्तक कसें असावें यासंबंधीं शिक्षणखात्याच्या भाषासमितीनें दिलेल्या आराखड्याला अनुसरून या मालेची योजना केली आहे. या मालेच्या पहिल्या पुस्तकाला पालक आणि शिक्षक यांच्याकडून चांगलें उत्तेजन मिळालें. शिक्षणतज्ज्ञ आणि प्रमुख वृत्तपत्रें यांच्याकडून चांगले अभिप्राय आले. पुरवणी वाचन पुस्तकाचा विद्यार्थ्यांना चांगला उपयोग होतो, हें अनुभवास आलें, म्हणून या मालेंतील पुढील पुस्तकें प्रकाशित करीत आहोंत.

या पुरवणी वाचन मालेला टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्रिन्सिपॉल व प्रसिद्ध शिक्षण-शास्त्रज्ञ प्रा. **ना. वि. पाटणकर** यांनीं प्रस्तावना लिहून दिली, याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोंत. या मालेच्या प्रकाशनाची जबाबदारी ' **नलेकर प्रकाशन** 'नें घेतल्यामुळेंच या मालेंतील पुढील पुस्तकें बालवाचकांच्या हातीं लवकर देणें शक्य होत आहे. या मालेसंबंधीं आपणांस आलेला अनुभव आम्हांस कळविल्यास आम्ही आपले आभारी होऊं.

१२३ शुक्रवार पेठ,<br>प्रल्हाद मंदिर, पुणें २<br>दि. ९।१०।१९५१

**वि. न. गोंधळेकर**

# प्रस्तावना

सात आठ वर्षें वयाच्या लहान मुलांना अक्षर-ओळख होऊन थोडें वाचतां येऊं लागलें म्हणजे हाताला लागेल तें पुस्तक वाचून पहावें असें त्यांना वाटूं लागतें. अशा वेळीं त्यांना समजतील आणि आवडतील अशीं पुस्तकें त्यांच्या हातांत पडलीं तर वाचनाची उत्पन्न झालेली गोडी टिकते; नाहींतर वाचनाचा कंटाळा येऊं लागून 'नकोत तीं पुस्तकें' अशी वृत्ति निर्माण होते. म्हणून या वयांतील मुलांकरितां योग्य अशीं पुस्तकें निर्माण करण्याची फार मोठी गरज असते.

अशीं पुस्तकें तयार करणें वाटतें तितकें सोपें काम नाहीं. मुलांची भाषेच्या बाबतींत झालेली प्रगति, त्यांच्या मनाची एकंदर घडण आणि तीवर आधारलेल्या त्यांच्या आवडीनिवडी यांची ज्याला पूर्ण माहिती झालेली आहे असा अनुभवी शिक्षकच त्यांना योग्य अशीं पुस्तकें लिहूं शकतो.

बालगोपालांकरितां अशीं पुस्तकें लिहिण्याची हीं अवघड कला श्री. शं. रा. देवळे, श्री. वि. न. गोंधळेकर आणि श्री. रं. म. जोशी यांना साधली आहे असें त्यांनीं लिहिलेल्या बालवाङ्मयावरून दिसून येतें. या छोट्या पुस्तकांतील धड्यांचे विषय मुलांच्या जिव्हाळ्याचे असून त्यांची मांडणीही पद्धतशीर केलेली आहे, सोपी भाषा, लहान लहान वाक्यें, परिचित शब्दांची निवड, मोठा टाईप आणि उद्बोधक चित्रें यांच्यामुळें ही सुरू केलेली 'माझें पुरवणी वाचन' ही माला लहान मुलांना निश्चित उपयुक्त आणि मनोरंजक होईल, अशी खात्री वाटते.

**ना. वि. पाटणकर**

दि. २३-९-१९५१

मराठीचे प्राध्यापक, टिळक कॉलेज
ऑफ एज्युकेशन, पुणें.

# अनुक्रमणिका


| पाठक्रमांक | पाठाचें नांव | पान |
|---|---|---|
| १. | आपलें निशाण .... .... .... | ५ |
| २. | पावसा पावसा .... .... .... | ८ |
| ३. | माझे आजोबा .... .... .... | ११ |
| ४. | सूत-कताई .... .... .... | १४ |
| ५. | मुंगी आणि मुंगळा .... .... .... | १७ |
| ६. | वानरा, वानरा, हुप् !.... .... .... | २० |
| ७. | शहाणा कुत्रा .... .... .... | २३ |
| ८. | ठेंगूमामा .... .... .... | २६ |
| ९. | पैसा बोलतो आहे ! .... .... .... | २९ |
| १०. | झेंडा ऊंचा रहे हमारा ! .... .... | ३४ |



## पुरवणी वाचन माला

भाग १, २, ३—प्रत्येकीं ६ आणे.

भाग ४—लवकरच प्रसिद्ध होईल.



प्रकाशक : बा. म. नेर्लेकर, नेर्लेकर बुकसेलर्स,
२६१ बुधवार, पुणें २

मुद्रक : स. रा. सरदेसाई, बी. ए., एलूएलू. बी.,
नवीन समर्थ विद्यालयाचा ‘ समर्थ भारत ’ छापखाना,
४१ बुधवार, पुणें २.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
नों. दि ..............
क्र. ..............


# माझें पुरवणी वाचन


## भाग तिसरा

### पाठ पहिला


## आपलें निशाण

आपल्या गांवांत मारुतीचें देऊळ आहे.
देवळावर झेंडा फडफडत आहे.
झेंड्याचा रंग भगवा आहे.
तो हिंदूंचा झेंडा आहे.





मैदानांत मशीद आहे.
मशिदीवर झेंडा फडफडत आहे.
त्याचा रंग हिरवा आहे.
तो झेंडा मुसलमानांचा आहे.



गांवाला वेस आहे.

वेशीवर झेंडा फडफडत आहे.

तो तिरंगी आहे.

तो आपल्या देशाचा आहे.

वरच्या बाजूस भगवा रंग आहे.

मधोमध पांढरा रंग आहे.

मधोमध निळें चक्र आहे.

त्याला अशोकचक्र म्हणतात.

खालच्या बाजूस हिरवा रंग आहे.

हा तिरंगी झेंडा आपल्या देशाचा आहे.

भारत हा आपला देश आहे.

भारत हा सर्व जातींचा देश आहे.

तिरंगी झेंडा सर्वांस आवडतो.

सर्वजण त्याचा मान राखतात.

चला, आपण त्याला वंदन करूं.

## ——झेंडावंदनाचें गाणें——

**तिरंगी झेंडा फडफडला। सारेजण वंदूं त्याला॥**
**जयहिंद गाउनी गान। राखुं या तयाचा मान।**
**केशरी, पांढरा, हिरवा—**
**फडफडतो गांवोगांवा.**
**सर्वांनीं नित्य पुजावा.**
**चक्रानें सुंदर नटला। स्वातंत्र्य मिळालें सकला।**
**तिरंगी झेंडा फडफडला। सारेजण वंदूं त्याला॥**

"जय हिंद"

### अभ्यास

१ आपल्या देशाच्या झेंड्यांत किती रंग आहेत? कोणते?

२ आपल्या देशाच्या झेंड्यावर कोणती खूण आहे?

पाठ दुसरा

## पावसा पावसा

आभाळ काळेंकुट्ट झालें. मधून मधून वीज चमके. ढग गडगड वाजत आणि गार वारा अंगाला झोंबे. दिनू टेकडीवर बसला होता. त्याला वाटे—"खूप जोराचा पाऊस यावा, नद्या नाले गच्च भरावे, पीक भरपूर यावें आणि सर्वांना पोटभर अन्न मिळावें. दुष्काळाचा त्रास नाहींसा व्हावा." दिनूनें हात जोडले, वर पाहिलें आणि म्हटलें:—

पावसा पावसा जोरांत ये
ज्वारी बाजरी भरपूर दे ।
हा घे पैसा तांब्याचा
सडा पडूं दे मोत्यांचा ॥

धों धों करीत पाऊस आला. सरीवर सरी कोसळूं लागल्या. चोहोंकडे पाणीच पाणी झालें. पावसानें दिनूचें ऐकलें. दिनू घरीं आला. सारखा पाऊस पडत होता. फार पाऊस झाला. गांवांतील जुनीं घरें पडलीं. नदीला महापूर आला. झाडें व गुरें वाहून गेलीं; चोहोंकडे दैना उडाली. पावसाची झोड

चालूच होती. लोकांना आतां पावसाचा राग आला. थोडा थोडा पडावा ना! दिनूनें पुन्हा हात जोडले, वर पाहिलें आणि म्हटलें:—



पावसा पावसा पुरे पुरे  
वाहुन गेलीं घरें गुरें।  
हा घे पैसा रेवड्या खा  
कड्कड् चावीत निघून जा॥

पावसानें दिनूचें ऐकलें. पाऊस थांबला. तो ढगांच्या काळ्या घोड्यावर बसला. विजेचा चाबूक फड् फडाड् वाजवला आणि वाऱ्याबरोबर निघून गेला!

**मग सर्वांना आनंद झाला. हत्तीचा पाऊस चांगला झाला. जमीन टवटवीत झाली. दिनू मैदानांत आला. दिनूचे मित्रही आले. सर्वजण गाणें म्हणून नाचूं लागले:**

**पाऊस यावा झिरीमिरी**
**सुंदर शेती पिकावी।**
**खूष व्हावे शेतकरी**
**दुनिया सारी हंसावी॥**

**टाळ्या वाजवुन आपण आतां सारेजण नाचूं।**
**पिकल्या शेतांमधले मोती झराझरा वेचूं॥**

## अभ्यास

१ खूप पाऊस पडल्यामुळें काय झालें ?

२ पावसाचा घोडा कोणता ? पावसाचा चाबूक कोणता ?

३ पावसाचें एकादें गाणें म्हणा.

पाठ तिसरा

# माझे आजोबा

अनुक्रम २५०३४



माझे आजोबा माहीत आहेत का? ते फार चांगले आहेत. ते मला रोज खाऊ देतात. ते मला फार आवडतात. आजोबा लवकर उठतात आणि देवाचीं गाणीं म्हणतात. मग ते फिरायला बाहेर जातात. फिरून आल्यावर आंघोळ करतात. आंघोळीनंतर देवपूजा. देवपूजेनंतर सूर्याला नमस्कार. नमस्कारानंतर दूध पिणें. रोज नियमानें हें व्हावयाचेंच.

आजोबांची बैठक पाहिली आहे का तुम्ही? आजोबांच्या खोलींत सतरंजी आहे. भिंतीला टेकून तक्क्या आहे. तक्क्याला टेकून आजोबा बसतात. ते चंचींतून पानें काढतात. पानाला चुना लावतात. अडकित्त्यानें सुपारी फोडतात. खलबत्त्यानें विडा कुटतात. थोडा मला देतात. बाकीचा ते खातात. विड्यानें तोंड कसें लाल लाल होतें!

एकदां मीं आजोबांची काठी लपविली. आजोबा फार रागावले. मग मी गेलों पळून. जेवायला घरीं आलोंच नाहीं. मग आजोबा आले शोधायला. मी बसलों लपून. त्यांनीं मला शोधून काढलें. माझा एक पापा घेतला. मग आम्ही घरीं आलों. मला त्यांनीं खाऊ दिला.

कधीं कधीं मी आजोबांचा अंगरखा घालतों. पायांत आजोबांचा जोडा घालतों. डोळ्याला आजोबांचा चष्मा लावतों. डोक्याला आजोबांची पगडी घालतों. हातांत आजोबांची काठी घेतों, आणि आईला धाक दाखवितों. मग आई माझे पापे घेते, आणि 'मामंजी गऽ बाई मामंजी' असें म्हणते.

## अभ्यास

१ आजोबांच्या खोलींत काय काय होतें ?

२ आजोबा कोणता पोशाख करीत ?

३ आजोबा कुटलेला विडा कां खातात ?

४ आजोबा कोणाला म्हणतात ?

५ आजोबांच्या चंचींत काय काय असतें ?

पाठ चौथा

## सूतकताई

हा पाहा कापूस कसा पांढरा पांढरा आहे ! किती मऊ मऊ आहे आणि छानदार पण आहे. तो शेतांतून आणला आहे. खूप आणला आहे. पण थोडा थोडा घ्या.



आतां आपण हा कापूस पिसूं. यांत बीं आहे. तिला सरकी म्हणतात. सरकी कशी काळी आहे ! कांहीं तांबडी पण आहे. सरकी बाजूला काढूं.

कापसाचे धागे पाहा. मऊ मऊ रेशमासारखे आहेत. यांतील कचरा काढूं. कापूस पिंजून काढूं. आतां हा रू झाला. रू हातावर लाटूं; हा पाहा पेळू झाला !



हं, घ्या आतां तकली. तकली कशी छान आहे ! तकलीला चकती आहे; चकती गोल आहे; तकलीला दांडी आहे. एका हातांत तकली घेऊं.

दुसऱ्या हातांत पेळू घेऊं. हातानें थोडा दोरा काढा. दांडीवर दोरा गुंडाळूं. आतां तकली फिरवूं. पेळूंतून धागा निघूं लागला. तकली खूप वेगानें फिरूं लागली : गर गर गर गर. सर सर सर सर.

सुताला पीळ पडूं लागला. आतां चकतीवर सूत गुंडाळूं. पुन्हा तकली फिरवूं. पेळूंतून धागा भरभर निघूं लागला. त्याला पीळ बसूं लागला. किती लांब सूत निघालें. किती बारीक सूत निघालें! सूत काततांना गाणें म्हणूं :

## सूतकताई (गाणें)

किती सूत भराभर निघतें—
तकली ही गरगर फिरते ।।
कापूस निसूं या खेळूं
रू मऊ करूं या पेळू ।।
तकलीस सूत गुंडाळूं
हा खेळ नसे कष्टाळू ।।
काम हें सहज करण्यातें
तकली बघ गरगर फिरते ।।
सारेजण मिळुनी या या
सुरू करूं सूत काताया ।।
बारीक अन् पक्का धागा
काढाया प्रथमाचि लागा ।।

सूत तर सरळ किती निघतें
तकली ही गरगर फिरते ॥
गांधींना करुनी नमन
करूं सूतकताई छान ॥

## अभ्यास

१ कापसांतील बींला काय म्हणतात ?

२ रू कशास म्हणतात ?

३ पेळू कसे बनवतात ?


४ सूत कशानें काढतात ?

५ गाळलेले शब्द भरा.

(अ) तकली....फिरते.

(आ) सूत....निघतें.





# मुंगी आणि मुंगळा

ओहो ! ही का शिपायांची पलटण आहे ? कशा रांगेत जात आहेत या मुंग्या ! सर्वांनीं अन्नाचे कण चालविले आहेत ! ! कोठें चालल्या आहेत या सर्व मुंग्या ? वारुळांत--

वारूळ हें मुंग्यांचें घर असतें. वारूळ मातीचें बनविलेलें असतें. तें मुंग्यांनींच तयार केलेलें असतें. वारूळ फार गमतीचें असतें. वारुळांत पाणी शिरत नाहीं. सापाशिवाय कोणालाच वारुळांत जातां येत नाहीं. पण सापसुद्धां वारुळांत जायला भितो. सगळ्या मुंग्या सापावर एकदम धांवतात. त्या सापाला कडकडून चावतात आणिं ठार मारतात.

वारुळांत राणी मुंगी असते. ती अंडीं घालते. अंड्यांतून मुंग्या जन्माला येतात. कांहीं मुंग्या काळ्या

असतात. कांहींचा रंग तांबडा असतो. कांहीं शिपाई मुंग्या असतात. त्या वारुळाची राखण करतात. त्या सारख्या फिरत असतात. त्या अन्न शोधीत असतात. कांहीं कामकरी मुंग्या असतात; त्या ओझीं वाहून आणतात. मुंग्या कधींही रिकाम्या बसत नाहींत. सर्व मुंग्या एकजुटीनें काम करीत असतात. वारुळांत सांठविलेलें अन्न मुंग्यांना पावसाळ्यांत फार उपयोगी पडतें.

मुंगीला सहा पाय असतात. मुंगीला सोंड आणि तोंड असतें. मुंग्या फार लहान असतात. मुंग्या फार चपळ असतात. कांहीं मुंग्यांना पावसाळ्यांत पंख फुटतात. चिखलावरून त्यांना उडतां येतें. चिखलानें त्यांचें अंग भरत नाहीं. पंखांचा त्यांना फार उपयोग होतो.

मुंग्या फार गरीब आणि मेहनती असतात. मुंग्या रांगेनें जातात आणि येतात. समोरून येणारी मुंगी सर्वांना भेटते आणि कांहींतरी विचारीत असते.

हा पहा मुंगीचा थोरला भाऊ! याला मुंगळा म्हणतात. मुंगीसारखेंच याचें शरीर आहे, पण थोडें मोठें आहे. मुंगळ्यांना वारूळ नसतें; ते कोठेंतरी जमिनींत राहतात. कांहीं मुंगळे झाडावरही राहतात.

मुंगळे रांगेनें चालत नाहींत. कसेतरी आणि कोठेंतरी भटकत असतात. मुंगळ्यांना गोड गोड पदार्थ फार आवडतात. ते जेथल्या तेथेंच खूप खातात. ते घरीं अन्न नेत नाहींत, कीं सांठवीत नाहींत. पावसाळ्यांत हजारों मुंगळे मरून जातात. मुंगळा कचकन् चावतो, सोडवला तरी सुटत नाहीं. शेवटीं त्याचें मुंडकें तुटतें. पंख असलेले मुंगळे फार वाईट असतात.

मुंगी आणि मुंगळ्याला आपण त्रास देऊं नये. कारण ते लहान आणि गरीब कीटक आहेत.

### अभ्यास

१ मुंग्यांच्या घराला काय म्हणतात ?

२ तें कशाचें केलेलें असतें ?

३ मुंग्यांचे प्रकार कोणकोणते आहेत ?

४ प्रत्येकजण कोणतें काम करतो ?

५ मुंग्यांना कसले पदार्थ आवडतात ?

पाठ सहावा

# वानरा, वानरा, हुप् !

आज गांवांत एक नवीनच वानर आलें होतें. या घरावरून त्या घरावर आणि या झाडावरून त्या झाडावर तें सारख्या उड्या मारीत पळत होतें. रस्त्यारस्त्यांतून मुलांची सारखी धांवदौड चालली होती. कांहीं मुलें ओरडत होतीं, कांहीं त्याला दगडही मारीत होतीं. मुलांच्या घोळक्यांतून आवाज येत होता—

" वानरा वानरा हुप् !
तुझ्या शेंडीला शेरभर तूप " ॥

कोणी त्या वानराला कांदाभाकरी तर कोणी दाणेफुटाणे चारले. कोणी हुसकूनही लावलें. मुलांच्या त्रासानें वानर चिडलें. त्यानें दांत विचकले. रागानें एका मुलाच्या तोंडांतही मारली. मग वानर एका झाडावर गेलें.

त्या झाडाखालीं वासुदेव बसला होता. तो त्या वानराला पाहून घाबरला. आरडाओरड केली कीं वानर रागावतें म्हणून वासू गप्प बसला.

झाडावर एक चिमणीचें घरटें होतें. तेथें तें वानर



गेलें. तेव्हां चिमणी ओरडून 'चिंव चिंव' करूं लागली. लपलेल्या वासूला चिमणीचा राग आला आणि तो हळूंच बोलला,--

" चिऊताई चिऊताई ।
बसा जरा चूप ॥
मोडून टाकील घरटें तुमचें ।
काळतोंड्या हूप ॥ "



पण चिमणी कांहीं ऐकेना. ती वानराच्या डोक्या-भोंवतीं घिरट्या घालून ओरडतच होती.

मग वानर संतापलें आणि त्यानें चिमणीचें घरटें

खालीं फेकून दिलें. तें घरटें लपलेल्या वासूच्या डोक्यावर नेमकें पालथें पडलें. तेव्हां तर वासू फारच घाबरला आणि पळत सुटला.

वासुदेवाच्या डोक्यावर ती पिसाऱ्याची टोपी पाहून मुलांना फारच गंमत वाटली. सारीं मुलें वासुदेवाच्या मागें पळत सुटलीं. मुलें ओरडत होतीं:

"दान पावलें। दान पावलें
वासूच्या टोपीला। पर लावलें।
हातीं बांधा टाळ। पायिं घाला चाळ
पायघोळ झग्यावर। खंडोबाची माळ।"

मग कांहीं मुलांनीं वासूच्या त्या टोपीला मोराचे पंख लावून सजविले आणि वासुदेवाला गांवांत मिरविलें !

## अभ्यास

१ वानराला लोकांनीं कोणता खाऊ दिला ?

२ वानरानें चिमणीचें घरटें कां फेकलें ?

३ वासूच्या मागें मुलांचें लटांबर कां लागलें ?

४ वानराचें अंग कसें असतें ?

५ 'वानरा वानरा हुप्'....हें गाणें मोठ्यानें म्हणा

## पाठ सातवा

# शहाणा कुत्रा



एक होता कुत्रा. तो आपल्या मालकाबरोबर शिकारीला जात असे. मालकाचें नांव रामराव होतें व त्याच्या मित्राचें नांव शामराव होतें. दोघेही घोड्यावर बसून शिकारीकरितां बाहेर पडले. रानांत गेले. एका हरणाच्या मागें लागले. घोडे भरधांव सोडले. घोड्यांचा वेग फार असल्यामुळें त्यांच्या डोक्यावरच्या साहेबी टोप्या केव्हां खालीं पडल्या हें त्यांना समजलेंहि नाहीं. शिकार अगदीं रंगांत

आली होती. हरिण जोरांत पळत होतें. त्याच्यामागें घोडेही पळत होते व त्याच्यामागें कुत्राही होता.

बराच वेळ झाला. कुत्रा दमला व सावकाश चालूं लागला. वाटेंत त्याला रामरावांची हॅट दिसली. त्यानें वासावरून ओळखलें कीं, आपल्या मालकाची टोपी आहे. त्या टोपीला पट्टा होता. त्यानें त्या पट्ट्यांत आपलें तोंड घातलें व गळ्यांत टोपी अडकवून मालकाचा शोध करीत चालला. इतक्यांत त्याला दुसरी हॅट दिसली. कुत्रा थांबला. आतां काय करावें म्हणून तो विचार करूं लागला. दुसऱ्या टोपीचा पट्टा तुटला होता. पण ती टोपी पहिल्या टोपीपेक्षां बरीच लहान होती. कुत्र्यानें काय गंमत केली ती पाहा. ती लहान टोपी त्या मोठ्या टोपींत घातली व पंजानें जरा दाबली. ती लहान टोपी त्या मोठ्या टोपींत नेमकी बसली. मग त्यानें पहिल्या-प्रमाणेंच गळ्यांत टोपी अडकविली व तो सावकाश चालूं लागला. इकडे रामराव व शामराव हे दोघेही घोड्यांवरून खालीं उतरले व विश्रांति घेत एका झाडाखालीं बसले व आपल्या कुत्र्याची मोठ्या आतुरतेनें वाट पहात होते.

बऱ्याच वेळानें त्यांना आपल्या कुत्र्याचा आवाज ऐकूं आला. म्हणून ते उठून उभे राहिले व पहातात तों आपला आवडता कुत्रा गळ्यांत टोप्या अडकवून व लंगडत येत आहे असें त्यांना दिसलें. काय आनंद झाला त्यांना! कुत्रा

समोर उभा राहिला. गळ्यांतील टोप्या काढून तो रामरावाजवळ गेला. रामराव शामरावाला म्हणाला, " बघ, काय माझा कुत्रा शहाणा आहे! त्यानें माझी हरवलेली हॅट शोधून आणली. " असें म्हणून त्यानें आपली हॅट घेतली व आंत पहातो तों दुसरी हॅट. रामराव म्हणाला, " अरे, नुसती मालकाचीच हॅट नाहीं आणली यानें, तर मालकाच्या मित्राची सुद्धां हॅट शोधून आणली. "

शामराव म्हणाला, " अरे रामराव, एक टोपी आणली असती तर कांहीं विशेष नव्हतें; पण हें बघ, माझी लहान टोपी तुझ्या टोपींत घालून कशी घट्ट बसाविली आहे पाहा. आपल्यासारख्या माणसाला सुद्धां इतकें ज्ञान नसतें."

"पण कायरे? त्याच्या पायांतून रक्त रे कसलं येत आहे? पळत येतांना त्याच्या पायाला कांहींतरी लागलं वाटतं. आतां आधीं त्याच्या पायाला फडकें बांध. मग शाबासकी दे तुझ्या लाडक्या कुत्र्याला. नुसती कोरडी शाबासकी नको देऊंस! दूध, आणि भाकरी त्याला खायला घाल, त्या कुत्र्याचा एक फोटो काढ व दे वर्तमानपत्रांत छापायला. कुत्रा असावा तर असा गुणाचा असावा! "

## अभ्यास

१ कुत्र्यानें टोप्या कशा आणल्या?

२ शहाण्या कुत्र्याची आणखी एखादी गोष्ट सांगा

३ कुत्र्याचें चित्र काढा.

पाठ आठवा

# ठेंगू मामा

'अहा रे ठेंगूमामा पिग्मी' सदू मधूला म्हणाला.

"आजी, पहा बरं हा सदू मला कसा चिडवतो!" मधू ओरडला.

"कायरे सदाशिव, आज हें काय नवीनच शिकून आलास?" आजी ओटीवर येऊन म्हणाल्या.

"खरंच आजी, आफ्रिकाखंडांत ठेंगूमामा पिग्मी या नांवाचीं लहान माणसं आहेत अगदीं मधूएवढीं" सदू दप्तर ठेवून म्हणाला.

आजी—अरे, माणसें मुलाएवढीं कशीं?

सदू—होय आजी, माणसेंच मुलाएवढीं ठेंगू आहेत आफ्रिकेंत. त्या मोठ्या खंडांतील मधल्या अंधारी जंगलांत राहतात तीं.

आजी—अंधारी जंगल? काय तरी बाई, ऐकावें तें नवलच! सांग तरी सारी माहिती.

सदू—पिग्मी माणसें फार गमतीचीं आहेत. दाट दाट आणि उंच उंच जंगलांत सतत पाऊस पडतो. पानपाचोळा कुजतो. सूर्यदर्शन जमिनीला नाहीं. पाणथळ जागा, हवा रोगट आणि उष्ण अशा

ठिकाणीं हे ठेंगू लोक राहतात. झाडपाल्याच्या बुटक्या झोपड्या. प्रत्येक झोपडीला दोन दारें. अंगावर कपडा नाहीं. रंगानें काळे आणि बुटगे. हातांत तीरकमठा. झोपडींत एक दोन मडकीं. जंगलांत शिकार करीत फिरायचं आणि मांस खाऊन जगायचं. कंदमुळें, फळें आणि नदींतलि मासेही खातात. थंडीतापाच्या दुखण्यानं लवकर मरून जातात बिचारे !

आजी—अग आईग ! औषधें नाहीं का घेत ते ?

सदू—तिथं कसले डॉक्टर अन् इंजेक्शनें. तिथें डांस हेच डॉक्टर. तेच सोंड खुपसून इंजेक्शन करतात आणि मारतात झालं ! त्यांच्या जंगलांत जायला अजून आपल्या शिकलेल्या लोकांना चांगला रस्ताच सांपडत नाहीं. कोणी गोरा गेलाच तर हे पिग्मी लोक दूर पळून जातात व जंगलांत गडप होतात; आणि जंगलांत तर मोठमोठे साप, हत्ती आणि बिनशेपटाचीं माकडें ! भयंकर जंगल. छातीच होत नाहीं कोणाची तेथें जायला !

आजी—कायतरी बाई, देशोदेशीचे लोक किती विचित्र ! देवाची करणी अगाध आहे बाई ! आणि कायरे सदू ! हे पिग्मी लोक अगदींच ठेंगू असतात

काय ? मागें एकदां गोंदूनें त्या गलीव्हर प्रवाशाची गंमतीची गोष्ट सांगितली होती; त्या गोष्टींतील माणसं अंगठ्याएवढींच उंच होतीं म्हणे !

सदू—छे छे, आजी, हीं माणसं तितकीं ठेंगणीं नसतात. साधारण आपल्या कमरेइतकीं उंच असतात. पण तीं फार बळकट व चपळ असतात. अगदीं माकडाचे भाऊबंदच !

आजी—असतील बाई ! बळकट नसायला काय झालें ? आपले पूर्वींचे लोक नव्हते का फार बळकट ? पण अलीकडे या मेल्या चहानें फारच कहर केला. माणसांचीं मढीं बनवलीं.

सदू—पण आजी आतां मी नाहींना चहा घेत ?

आजी—चल तर घरांत. मधू तुझ्यासाठीं खोळंबला आहे. शाळेंतून येऊन जेवण करावयाचें तर बसला आपला मधूला चिडवीत ! म्हणे "अहारे ठेंगूमामा पिग्मी !"

## अभ्यास

१ 'पिग्मी' म्हणून कोणीं कोणाला चिडविलें ?

२ पिग्मी माणसांविषयीं तुम्हांला काय माहिती मिळाली ?

३ तीं लवकर कशानें मरतात ?

पाठ नववा

# पैसा बोलतो आहे !




[ एकदां एका दुकानदाराच्या पेटींत पैशांची वाण पडली. तेव्हां तेथें असलेल्या थोड्याशा पैशांना सहज बोलायला मोकळीक झाली. ]

रुपयाची नोट—का रे भाऊ, काळा पडलास अगदीं ?

रुपया—काय करूं ताई, माझी चांदीच उडाली !

अधेली—माझी पण चांदी कमी झाली.

नोट—अलीकडे सर्वांचंच असं झालंय खरं ! पण ती पावली कुठें पळाली ?

अधेली—तिचाही आवाज बंद झालेला दिसतो. ती बघा, गुपचूप कोपऱ्यांत बसली आहे !

चवली ( हंसून )—मलाच नांवं ठेवीत होतां ? आतां सर्वांचींच कशीं तोंडं काळीं पडलीं !

नोट—अग, गिन्नी पण गिलिटाचींच होती !

पैसा—थांबा थांबा ! हे पाहा, आमचे ढब्बुनाना !

अधेली—कुठें आहेत ते लठ्ठोबा ?

पैसा—हे पाहा, माझ्या मागें लपले आहेत. माझ्या पोटाच्या गोल खिडकीमधून ते डोकावत आहेत.

पावली—अगबाई, हे तर आतां चांगलेच रोडावले आहेत. रेशनचं अन्न हे खातात वाटतं ! ह्यांचा जडपणा मात्र त्यामुळें पार पळून गेला आहे.

चवली—अग, ह्यांचा रंग पालटला, रूप बदललं, तांब्याचे होते ते गिलिटाचे बनले आणि गोल गलेलठ्ठ होते ते आतां चारी बाजूंना हाडं दिसूं लागलीं. चौकोनी झाले.

अधेली—तुमचं पिल्लूच दिसतंयू जणूं ! आणि हो ! ती छोटी पै दिसत नाहीं ?

पैसा—ती कांहीं बाहेर पडत नाहीं....भिते. शाळेंतलीं मुलं उगीच ओरडत असतात : "बारा पैंचा आणा ! बारा पैंचा आणा." तिला घोकणी लावली आणि ती लपली.

आणेली—अग, पण ह्या पैशालाच हौस फार मिरवायची. पैचं काम हाच करून टाकतो बाजारांत. अहाहा ! काय पण ध्यान ! तें वाटोळं रिकामं पोट बघा. हवाच जास्त आहे पोटांत ! बायका तर कपाळावर ठेवून पैशानं कुंकू लावतात. बायकांचा नामच आहे हा !

नोट—बाजारांत पैशापेक्षां आमचाच उपयोग फार लोक करतातः पैशांचं जड ओझं लोकांना नको. आम्ही कितीजणी तरी एकाच खिशांत बसतों. सारखी देवघेव चालते. बघा ना ! लोकांनीं आमच्या घड्या पाडून आम्हांला किती घाणेरड्या केल्या आहेत !

रुपया—लोक तर नोटांना फार जपत असतात. पूर्वीं आम्हांला लोक दगडावर आपटीत. आतां ठीक आहे. आम्हांला त्रास देऊन पोचे आणले तर माणसाला दंड बसतो. पण लोक नोटाच जास्त वापरतात आणि त्यांना फार जपतात.


नोट—बरोबरच आहे. कागदी चलन जपूनच वापरलं पाहिजे. नाहींतर थेट कचेरी पाहावी लागते.

पावली—अहो थांबा, मी पुर्डीमली आजीबाई डोकावूं लागली पाहा ! आपले मालक तिला फार जपतात. ते म्हणाले होते एकदां, कीं—"जुनें तें सोनें," नाहीं का हो आजीबाई ?

मोहोर—मुलींनो आणि मुलांनो—माझं नांव मोहोर आहे. मी सोन्याची आहें. मी तुमच्यासारखीच नाणें होतें. पूर्वी लोक माझा उपयोग करीत. पूर्वी लोक श्रीमंत होते. सुखी होते. आतांचे लोक सोन्या-ऐवजीं कागद वापरतात. हिंदुस्थानचं सोनं आतां दर्यापार गेलं आहे. आपण सारीं नाणीं टांकसाळींत बनलों. तिथं यंत्रानं नाणीं छापतात. तो कारखाना सरकारी असतो. सोनं, चांदी, गिलीट, तांबें आणि कागद ह्यांवर सरकारी शिक्का मारला, कीं आपलीं नाणीं आणि चलन तयार होतं. देशोदेशीं असे कारखाने आहेत....

खजीनदार—अहो आजीबाई, पुरे झालं पुराण. नाहींतरी म्हाताऱ्यांना तोंडच फार. चला, गप्प बसा. तोंड बंद करा. नोटा इकडे पेटींत आणि नाणीं

**तिकडे थैलींत ! आवाज कराल तर एखादा दरोडेखोर ऐकेल ! गप्प राहा !**




## अभ्यास

१ चित्रांत तुम्हांला नाणीं किती दिसतात ?

२ तीं नाणीं कोणतीं आहेत ?

३ नाणीं कशाचीं केलेलीं असतात ?

४ मोहोर म्हणजे काय ? ती कशाची केलेली असते ?

५ वरील संवाद वर्गांत करून दाखवा.

## प्राथमिक इयत्ता १ ते ४ मधील विद्यार्थ्यांकरितां

सामान्यज्ञानाच्या सरकारी नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें लिहिलेली व

**सरकारनें पुरवणी वाचनासाठीं मंजूर केलेलीं**

**भूगोल, नागरिकशास्त्र, सृष्टिशास्त्र व आरोग्यशास्त्र**

वगैरे सर्व विषय **एकत्र असलेलीं** उपयुक्त पुस्तकें

# मुलांचें सामान्य-ज्ञान

( लेखक:—देवळे–गोंधळेकर )

**इयत्ता पहिली : सहा आणे.  इयत्ता दुसरी : आठ आणे**

**इयत्ता तिसरी : दहा आणे.  इयत्ता चौथी : बारा आणे**

प्राथमिक शाळांमधील इ. १ ते ४ च्या नवीन अभ्यासक्रमांत नागरिकशास्त्र, भूगोल व सृष्टिशास्त्र हे विषय वेगळे दिलेले नसून ते सर्व ‘ सामान्यज्ञान ’ या सदराखालीं शिकवावयाचे आहेत. वरील पुस्तकांत हे सर्व विषय एकत्र दिले असल्यामुळें प्रत्येक विषयाला वेगळें पुस्तक विकत घेण्याची जरुरी नाहीं. सामान्यज्ञानाचें एकच पुस्तक घेतलें कीं सर्व विषयांचा अभ्यासक्रम व्यवस्थित शिकतां व शिकविनां येईल.

पुस्तकांचा आकार : सरकारी पुस्तकाएवढा ( डेमी )

शिक्षणतज्ज्ञांचे उत्तम अभिप्राय : प्रत्येक धड्यास चित्र : रेखीव व मोठ्या टाइपांत छपाई : मौजेचा, आकर्षक व सोपा मजकूर.

**प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, गिरगांव, मुंबई नं. ४.**

IRBK-0103824

## श्री. नेर्लेकर बुकसेलर्स यांचीं अभिनव प्रकाशनें

१ माझें पुरवणी वाचन : भाग १ ते ४
( जोशी–गोंधळेकर ) किंमत ६ आणे

२ मौजच मौज : पुष्पें १ ते ५
( दामले–गोंधळेकर ) किंमत प्रत्येकी ८ आणे

३ गोष्टीच गोष्टी : भाग १ ते ५
( लिमये–गोंधळेकर ) किंमत प्रत्येकी ६ आणे

४ माझे चित्रांचें पुस्तक: ( लहान मुलांमुलींकरितां )
( घोरपडे–गोंधळेकर ) किंमत ६ आणे

५ माझे सोपे संवाद ( जोडाक्षरांविरहित )
( लिमयेगुरुजी ) किंमत ६ आणे

**माझें पुरवणीवाचन** [ लेखक—जोशी—देवळे—गोंधळेकर. ]

★ ' यांतील धडे मनोरंजक व चित्रें आल्हादकारक आहेत. मुलांना पुस्तक फार आवडेल.'—**विविधवृत्त, मुंबई.**

★ ' यांतील गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत लिहिल्या असून ठळक अक्षरांत छापल्या आहेत. मराठी पहिली व दुसरी करितां हें पुस्तक खास उपयुक्त ठरेल.'—**दैनिक भारत, पुणें.**

★ ' साक्षरता प्रसारास हें पुस्तक फारच उपयुक्त आहे. किंमतहि माफक आहे.'— **वऱ्हाडा, नागपूर.**

★ ' मुलांच्या हातांत हें पुस्तक दिल्यानें त्यांची वाचनाची गोडी निश्चित वाढेल.' —**सेवक, रत्नागिरी.**

' मराठी इयत्ता पहिली व दुसरी तसेंच साक्षरताप्रसाराकरितां हें पुस्तक फारच छान आहे.'—**गर्जना, कोल्हापूर.**